N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** बंडगार्डन **Year (वर्ष):** 2019
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0081 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/02/2019 13:05 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 7
**Date From (दिनांक पासून):** 15/02/2019
**Date To ( दिनांक पर्यंत):** 15/02/2019
**Time From (वेळेपासून):** 21:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/02/2019 **Time (वेळ):** 12:49 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 011 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/02/2019 12:49 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
(a) **Name (नाव):** पांडुरंग भगवान घाडगे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1961 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भंगार व्यवसाय, रातुपारी, ,ता पलुस, ,सांगली,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भंगार व्यवसाय, रातुपारी, ,ता पलुस, ,सांगली,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | स्वप्निल भीमराव भद्रे | | | 1. रा अ /05रूम न 12,विश्रांतवाडी पो लाईन,पुणे ,बंडगार्डन,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अनोश ऑगस्टिन गायकवाड | | | 1. रा कनक आपार्ट फ्लॅट नं 12,सेंट सबस्टिन हाय स्कूल जवळ दौं,पुणे ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम सूचना तथ्य ):

भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन ) अधिनियम कलम 7,12
बंडगार्डन पो स्टे गु.रजि.नं- 81/2019,भ्रष्टाचार प्रतिबंध अधियम सन 1988भ्रष्टाचार प्रतिबंधक (संशोधन ) अधिनियम कलम 7,12
अन्वये रिपोर्ट पोउपनि ढोले बंडगार्डन पो स्टे फिर्यादी- श्री पांडुरंग भगवान घाडगे, वय 58 वर्षे, धंदा- भंगार व्यवसाय, रा.तुपारी, ता. पलुस, जि. सांगली, आरोपी - पोलिस कर्मचारी श्री स्वप्निल भीमराव भद्रे, वय 30, पोलिस शिपाई 10157 , श्री अनोश ऑगस्टिन गायकवाड, वय 24, पोलिस शिपाई 12015, दोघेही नेमणुक पोलिस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे अ घ ता वेळ ठीकाण दिनांक 15/02/2019 रोजी 21.30 वा. ससुन हस्पिटल, गेट नं 2 समोर, पुणे मिळावेला माल-5000/- रूपये हकीकद मी श्री पांडुरंग भगवान घाडगे, समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे कार्यालयात हजर राहुन फिर्याद देतो की, आमच्या फर्मने किसन वीर सहकारी कारखाना, ता. वाई, जि. सातारा, या कारखान्यातील भंगार विकत घेण्यासाठी टेंडर भरले होते. आम्ही भरलेले टेंडर मंजुर होऊन आमच्या कंपनीचे 2 बयलर भंगारमाल आम्हास मिळाला. आम्ही त्यासाठी दहा लाख रुपये डिपझिट कारखान्यात भरले होते. सदर मालाची किंमत एक कोटी पस्तीस लाख पन्नास हजार रुपये इतकी होती. (1,3550,000/- रु.) आम्हाला टंडर मिळाल्यानंतर आम्ही तो माल मुंबई येथील मोडीलाल कंपनीचे मनोज जैन एक कोटी त्र्याए◌ंशी लाख पन्नास हजार रुपयांना विकला. आमच्याकडे एवढी रक्कम नसल्याने आमच्यात झालेल्या तोंडी करारान्वये सदर माल मनोज जैन यांनी विकत घेण्यासाठी एक कोटी पस्तीस लाख पन्नास हजार रुपये डायरेक्ट साखर कारखान्यात भरले व उर्वरीत आमचा नफा 48,00,000/- रुपये त्यांनी आम्हास दिले नाही व परस्पर आम्हास काहीएक न कळविता कारखान्यातुन माल उचलुन घेऊन गेले. त्यांनी आमची कोणतीही परमिशन घेतली नव्हती. आम्ही त्यांना फायदयाची व डिपझिटसाठी दिलेली रक्कम मागितली असता त्यांनी आम्हास फक्त अडीचलाख रुपये दिले. आम्ही कंपनीस उर्वरीत आमची रक्कम मागितली असता त्यांनी माझा मुलगा शुकराज पांडुरंग घाडगे व आमचा कामगार शामराव विठ्ठल तेवरे यांचे विरुध्द खंडणीचा गुन्हा भुइंज पोलीस स्टेशन येथे दाखल केला. त्यांना सदर गुन्हयात शामराव यास 3 ऑगस्ट 2018 रोजी व माझा मुलगा शुकराज यास 6 सप्टेंबर 2018 रोजी अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर नंतर मोका अंतर्गत कारवाईही करण्यात आली असुन ते दोघेही सध्या येरवडा जेल, पुणे येथे न्यायलयीन कस्टडी मध्ये आहेत. माझा मुलगा शुकराज व कामगार शामराव यांनी त्यांचेवर खोटा गुन्हा दाखल केला व मोका अंतर्गत कारवाई केली त्याची सीबीआय चौकशी करावी म्हणुन येरवडा जेल येथे दिनांक 01/02/2019 पासुन आमरण उपोषणास बसले आहेत. माझ्या मुलाची तब्येत खालावल्यानंतर त्यास जेल अधिकायांनी ससुन ह, पुणे येथे औषोधपचाराकरीता



Scanned by CamScanner

ॲडमीट केले त्यानंतर शामराव यासही ससुन मध्ये अडमिट केले आहे. मला माझ्या मुलास ससुन मध्ये भेटण्यासाठी अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे यांनी परवाणगी दिली आहे. मी माझी पत्नी तसेच त्याची पत्नी ज्योती शुकराज घाडगे, व इतर नातेवाईक त्यास भेटण्यासाठी ससुन येथे जात असतो. तेथे गार्ड डयुटीसाठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे पोलीस मुख्यालयातील पोलीस नेमलेले आहेत. ते शुकराज यास भेट घेऊ देण्यासाठी पैशाची मागणी करतात. मी आता पर्यत मी तेथील डयुटीसाठी असणाया पोलीसांना 90 हजार रुपये दिले आहेत. मी दिलेले पैसे डयुटीवर असलेले पोलीस आपसात वाटुन घेतात. आज दिनांक 15/10/2019 रोजी आम्ही पुन्हा शुकराज यास भेटण्याकरीता ससुन ह येथे गेलो असता तेथे माझ्या मुलाचे गार्ड डयुटीस असलेल्या धिवरे पोलिस व त्यांचे तीन सहकारी कर्मचा-यांनी मला 20 हजार रुपयांची मागणी केली. आज रोजी सायंकाळी माझ्या मुलास डिस्चार्ज मिळाला असुन त्यास पुन्हा येरवडा जेल येथे नेण्यात आले तथापी त्यानंतरही माझा मोबाईल नंबर 8380805957 या नंबरवर मला 8421496749 या मोबाईल नंबरवरुन आज रोजी सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास एका पोलीसाचा फोन आला व मला म्हणाले की आम्ही तुमच्या मुलाची भेट घालून दिली आहे आता तुम्ही आम्हाला 15 हजार रुपये दया. मी त्यांना तुम्ही ससुन जवळ आल्यावर फोन करा मी येतो. असे म्हणालो. त्यांनी त्यावर आम्ही तेथे आलो की तुम्हाला फोन करता तुम्ही पैसे घेऊन या असे सांगितले. मला त्या पोलिसांना पैसे द्यायचे नसल्याने तक्रार नोंदविण्यासाठी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात आलो व माझी तक्रार दिली आहे.माझी तक्रारीवर कारवाईसाठी मा श्री नाडगौडा यांना भेटलो त्यांनी श्रीमती प्रतिभा शेंडगे, यांना त्यांचे चेंबरमध्ये बोलावुन माझे तक्रारीवर कारवाई करणे बाबत आदेशित करुन त्यांना मदतीसाठी श्री दत्तात्रय भापकर, सहा पो आयुक्त, पोहेक खान, पो शि कु-हे, पो ना माळी, याप्रमाणे सापळा पथक उपलब्ध करुन दिले.श्रीमती शेंडगे यांनी माझे तक्रारीवर कारवाईसाठी कृषी विभाग,शिवाजीनगर, पुणे यांचेकडुन गोपनिय कामकाजासाठी पंच साक्षिदार नामे 1) श्री. अनिल गोविंदराव सोनार,- कृषि पर्यवेक्षक 2) श्री. गजानन दिनकर गायकवाड, - लिपीक, यांची सेवा उपलब्ध करुन घेतली. श्रीमती शेंडगे यांनी आलेल्या पंचाशी माझी व सापळा पथकातील सदस्यांची ओळख करुन दिली. याच दरम्यान लोकसेवक पोलिस यांचा मला माझ्या 8380805957 यावर त्यांचे 8421496749 यावरुन फोन आला मी तो रिसिव्ह करुन मला दिले सुचनेप्रमाणे त्याचा स्पिकर चालु केला असता समोरील इसमाने तो पोलिस बोलत असल्याचे कळवुन ससुन ह गेटसमोर येण्याबाबत त्यांनी मला सांगितले. सदरचा फोन हा पंचासमक्ष व्हाईस रेकर्डरमध्ये रेकर्ड करण्यात आला. लोकसेवक पोलिस यांनी मला ससुन ह, गेटसमोर बोलाविले असल्याने मला व्हाईस रेकडर लावुन पंच साक्षिदार श्री अनिल सोनार यांचेसह ससुन चे गेटवर,पुणे येथे पाठवुन माझे तक्रारीची पडताळणी करणेत आली असता पडताळणी कारवाई करण्यात आली या कारवाईमध्ये मला भेटण्यास आलेल्या पोलिसांना त्यांची नावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे भद्रे, व गायकवाड असल्याचे समजले मी त्यांना पाहिल्यानंतर हेच दोन पोलिस दिनांक 15/02/2019 रोजी ससुन मध्ये मुलगा शुकराज याचे गार्ड डयुटीसाठी असल्याचे मी ओळखले. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. भद्रे यांनी पंचासमक्ष मला मुलाला भेटु दिले म्हणुन 20,000/- रुपयांची लाचेची मागणी केली. त्यावेळी माझ्याकडे पैसे नव्हते परंतु माझी पत्नी यमुनाबाई या ससुन च्या गेटवरच असल्याने मी त्यांचेकडुन घेवुन 5,000/- रुपये लगेचच श्री भद्रे यांचेकडे दिले असता श्री भद्रे व गायकवाड यांनी उरलेल्या 15,000/- रुपयांची माझ्याकडे मागणी करुन सदरचे पैसे लगेचच घेवुन येण्याबाबत सांगितले. श्री भद्रे व गायकवाड पोलिस यांनी मला 15,000/- रुपये लाच रक्कम घेवुन येण्याबाबत कळविल्याने लोकसेवक श्री. भद्रे व गायकवाड यांना लाच म्हणुन देणेसाठी आणलेली रोख रक्कम 15,000/- रु. सापळा पथक व पंचाचे समक्ष हजर केली . त्यात 2000/- रुपये दराच्या 7 नोटा व 500 रुपयांच्या 2 नोटा आहेत. सदर नोटांना अँन्थेसिन पावडर लावण्याचा व त्याचे गुणधर्म समजावुन सांगण्याचा सापळापुर्व पंचनामा खाजगी वाहनात, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेच्या रोडलगत, पुणे येथे करण्यात आला आहे. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. भद्रे पोलिस व गायकवाड पोलिस यांनी मला लाच रक्कम घेवुन ससुन हास्पिटलचे गेटजवळ बोलाविले असल्याने त्याप्रमाणे ससुन हस्पिटल, गेट नं 2(आऊट गेट) परिसरात सापळा कारवाईचे आयोजन करण्यात आले. सापळा कारवाई दरम्यान गेटच्या समोर श्री स्वप्निल भद्रे यांनी माझ्याकडुन लाच रक्कम 15,000/- रु. स्विकारुन पळुन जात असताना तर त्याचे सहकारी पोलिस श्री गायकवाड हे दुचाकीवर बसले असताना दोघांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आले ती वेळ रात्री 21.30 वा. ची होती. श्री स्वप्निल भद्रे व अनोश गायकवाड यांना सापळा पथकातील श्रीमती प्रतिभा शेंडगे यांनी ओळख सांगुन त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारता त्यांनी आपली नावे श्री स्वप्निल भीमराव भद्रे, वय 30, पोलिस शिपाई 10157 , , श्री अनोश ऑगस्टिन गायकवाड, वय 24, पोलिस शिपाई 12015, दोघांचीही नेमणुक, पोलिस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे अशी सांगितली. लोकसेवक पोलिस श्री भद्रे हे लाच रकमेसह ससुन हस्पीटल समोरुन पळुन जात असताना ससुन क्वाटर्स , बंडगार्डन पो स्टेशन समोर पकडण्यात आले. याच ठिकाणी झाडाखाली पडलेली लाच रक्कम रुपये 15,000/- पंचासमक्ष हस्तगत करण्यात आली. तसेच पडताळणी कारवाई दरम्यान दिलेले 5000/- लाच रकमेबाबत आरोपी लोकसेवक यांचेकडे विचारणा केली असता भद्रे यांनी सदरची रक्कम स्वता स्विकारुन ती गायकवाड यांचेकडे दिल्याचे पंचासमक्ष सांगितले त्याप्रमाणे गायकवाड यांचे अंगझडती मध्ये सदरची रक्कम मिळुन आल्याने ती जप्त करण्यात आली एकंदरीत माझी दिनांक 15/02/2019 रोजीची मुळ तक्रार त्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 15/02/2019 रोजी पंचासमक्ष करण्यात आलेली पडताळणी आणि केलेली सापळा कारवाई या दरम्यान घडलेल्या घटना, तसेच प्रत्यक्ष व ध्वनिमुद्रीत झालेले संभाषण यावरून माझा मुलगा शुकराज यास येरवडा जेलमधुन उपचारासाठी ससुन ह मध्ये दाखल केले असताना त्याला भेटु देण्यासाठी गार्ड डयुटीवर असणारे पोलिस कर्मचारी श्री स्वप्निल भीमराव भद्रे, वय 30, पोलिस शिपाई 10157 , श्री अनोश ऑगस्टिन गायकवाड, वय 24, पोलिस शिपाई 12015, दोघेही नेमणुक पोलिस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे यंनी माझ्याकडे रु. 20,000/- ची लाचेची मागणी करुन दिनांक 15/02/2019 रोजी 21.30 वा. ससुन हस्पिटल, गेट नं 2 समोर, पुणे येथे लाच रक्कम 20,000/- रु. चा स्विकार केला म्हणुन माझी त्याचेविरुध्द तक्रार आहे. पुढिल तपास- सहाय्यक पोलीस आयुक्त प्रतिभा शेंडगे लाचलुचपत विभाग पुणे

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): MAHAMAD HANIF MAHAMAD YUNUS MUJAWAR(Inspector)) / DGPMMMM6505 **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार



Scanned by CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): MAHAMAD HANIF MAHAMAD
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPMMMM6505

Scanned by CamScanner